# १५ ऑगस्ट स्वतंत्रता दिवस साजरा करण्यात आला.

जा.क्र. ५०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१५/०८/२०१६.

भंडारा :— येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर दि. १५/०८/२०१६ रोजी १५ ऑगस्ट स्वतंत्र दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पालकमंत्री मा. श्री. डॉ. दिपक सावंत व मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. अभिजीत चौधरी हे होते. तसेच मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनिता शाहु हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीताने करण्यात आली. व ध्वजारोहण पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर मा. पालकमंत्री यांनी परेडचे निरीक्षण केले. यावेळी भंडारा जिल्हा पोलीस दल, भंडारा गृहरक्षक दल, एन. सी. पथक, दामीणी पथक, पोलीस श्वान पथक मिळुन अशा ०९ पथंकाचा समावेश होता. तसेच पंचायत समितीच्या वतीने पर्यावरण संदेश, स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. यावेळी परेड कमांडर सुधीर वर्मा सहाय्यक पोलीस निरीक्षक पो.स्टे साकोली हे होते. तसेच दुय्यम परेड कमांडर मधुकर प्रधान पोलीस उपनिरीक्षक पो. मु.भंडारा हे करीत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने मा. पालकमंत्री भंडारा यांनी आपल्या भाषणामध्ये पत्रकार, माजी सैनीक, शिक्षक, कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी आलेल्या सर्व उपस्थितांचे आनंद व्यक्त केले. वर्षभराच्या शासनाच्या उल्लेखनीय कामगीरीचा आढावा घेतला. व हे सर्व जनतेच्या सहकार्याशिवाय करणे शक्य नाही करीता जनतेने असेच सहकार्य करावे असे आव्हान सुध्दा केले. त्यांनी ग्रामीण तसेच शहरी समस्या जाणुन शेतक—यांचे, मासेमाराचे, गोसेखुर्द, शिवनीबांध प्रकल्प, इंदिरा आवास योजना, महीला बचत गट कर्ज उपलब्ध, दारिदय योजना, क्रिडा संकुल, तंटामुक्त गाव, माता मृत्यु रोखणे, जिल्हा परीषदा मार्फत नवीन योजनांचा बाबत मार्गदर्शन केले. तसेच पोलीस संघटनाव्दारे आपले कार्य पुढे सुरळीत पाळावे. जेणे करुन विविध विभांगानी आपआपल्या क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी जनतेच्या स्मरणात यावी व जनतेला एक चांगला संदेश मिळावा.

त्यानंतर भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे परेड, तसेच शिक्षण विभाग पंचायत समिती भंडारा यांचे तर्फे सिल्ली येथील शाळेने शिक्षणाचा संदेश देणारे चित्ररथ, पोलीस कवायत मैदानाच्या प्रांगणात सभोवताल मिरविण्यात आले. यावेळी सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये पोलीस पुरुष प्लॅटुन व महीलांचा समावेश होता. यावेळी भंडारा जिल्हा पोलीस बॅन्ड पथकाने उत्कृष्ट वादयवृंद सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी पारितोषिके वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. माझी कन्या भाग्यश्री योजने अंतर्गत उत्कुष्ट कामगिरी करणा—यांना प्रमाणपत्र देवून गौरान्वीत करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला मा.पालकमंत्री भंडारा, श्री.डॉ. दिपक सावंत, मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. अभिजीत चौधरी, मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता शाहु, मुख्य कार्यकारी अधिकारी गौर भंडारा, जिल्हा माहीती अधिकारी भंडारा, उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. जोगदंळ भंडारा, राखीव पोलीस निरीक्षक (पो. मु.) श्री. लोळे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच भंडारा पोलीस दलातील विविध शाखेचे/पोस्टेचे पोलीस अधिकारी/कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, ईलेक्ट्रॉक मिडीया, पत्रकार बंधु, व मोठया प्रमाणात विविध क्षेत्रातील जनसमुह उपतस्थित होता. कार्यक्राचे सुत्रसंचालन श्रीमती स्मिता गालफाडे व मुंकुद ठवकर यांनी केले.

(श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.